गणपती बाप्पा मोरया...

गणेशोत्सवाच्या निमित्ताने हिंदी पडद्यावरच्या गणेश दर्शनाची एक झलक...

❑ स्मिता प्रकाशकर



*दर्द का रिश्ता*मध्ये सुनील दत्त

शंकराच्या भव्य मूर्तीशी भांडणारा अमिताभ किंवा शंकराच्या उंच मूर्तीसमोर उभं राहून चांगला नवरा दे म्हणून गळ घालणारी *शोले*ची हेमामालिनी, देवीच्या देवळात गरबा खेळणारे अमिताभ-रेखा(*सुहाग*) अशी अनेक दृश्यं हिंदी सिनेमात दिसतात. होळी, रंगपंचमी, नवरात्री, गोकुळाष्टमी हे सण पडद्यावर दणक्यात साजरे केले जातात. मात्र ज्या मुंबईत या इंडस्ट्रीचा व्याप इतका वाढलाय, त्या मुंबईचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाचं प्रस्थ हिंदीत विशेष दिसत नाही.

हिंदी पडद्यावरचा गणेशोत्सव म्हटला की आठवतो तो *सत्या*चा क्लायमॅक्स. खलनायक गोविंद नामदेव गणपती विसर्जनाला गेला असताना हीरो सत्या(चक्रवर्ती) सूरा भोसकून त्याचा खून करतो. समोर अथांग सागर आणि मागे विशाल जनसागर अशा पार्श्वभूमीवर उत्सवाच्या वातावरणात झालेला तो खून अंगावर सर्रकन काटा उभा करतो.

*हमसे बढकर कौन*मध्ये अमजद खान, मिथुन, डॅनी वगैरे मंडळी भक्त म्हणून नव्हे तर चोर म्हणून ज्या गणरायाच्या दर्शनाला येतात, त्याच्या पोटात लपवून ठेवलेले लाखो रुपयांचे दागिने हस्तगत करण्यासाठी या मंडळींची भक्ती उफाळून आलेली असते. '...और तुम्हारे भक्तगणों में हमसे बढकर कौन' असा खडा सवालच ते सगळे गणपतीला विचारतात.

गणपती विसर्जनाची मिरवणूक निघालीय आणि त्याचा फायदा घेऊन नायक खलनायकाशी आपला जुना हिशोब चुकता करायला आलाय, अशी कथा रंगवण्यासाठी ही मिरवणूक दाखवली गेलीय बरं का? अमिताभचा *एक ही रास्ता* आठवला ना? खलनायक सदाशीव अमरापुरकरला मारण्यासाठी तो गणपती विसर्जनाच्या गर्दीचा फायदा घ्यायचं ठरवतो आणि संधी साधतोही. *अग्नीपथ* चित्रपटातही अशीच गणपतीची मिरवणूक निघालेली असते. त्यावेळी मात्र या गर्दीचा फायदा घेऊन अमिताभ बच्चनवर जीवघेणा हल्ला केला जातो, असं दृश्य रंगवण्यात आलंय.

मिथुनच्याच *साहस* या सिनेमातही असंच एक दृश्य आहे. मिथुन त्यात डिटेक्टिव्ह बनलाय. गुन्हेगारांचा शोध घेत घेत तो एका गणपती विसर्जनाच्या मिरवणूकीत पोहोचतो. 'आओ जरा झूमो जरा नाचो जरा...' असे त्याचे बोल आहेत. अगदी अलिकडे प्रदर्शित झालेल्या *वास्तव*मध्ये गणपतीची आरती चालू असतानाच नायकाच्या गँगमधल्या मुलांचा एन्काऊंटर होतो, असं एक दृश्य आहे. *कालचक्र* सिनेमातही प्रिया तेंडुलकर, सुरेश ओबेरॉय, मदन जैन यांच्यावर चित्रीत एक सुंदर गणपतीचं गाणं आहे.

पण या सगळ्यापेक्षा वेगळी आणि लक्षात राहणारी गणपती विसर्जनाची मिरवणूक आहे ती *दर्द का रिश्ता* या सिनेमात. यातल्या या गाण्याला कारुण्याची झालर आहे. सुनील दत्तची गणपतीभक्त मुलगी खुशबू अखेरच्या घटका मोजत असते आणि तशातही घरातल्या गणपतीचं विसर्जन करायला निघालेला सुनील दत्त मुलगी या आजारातून वाचावी म्हणून गणपतीची आळवणी करताना म्हणतो, 'मेरे मन मंदिर में तुम भगवान रहे, मेरे दुख से तुम कैसे अन्जान रहे...' पण असा एखाद दुसरा अपवाद वगळता गणपतीबाप्पा हिंदी चित्रपटात दिसले ते हाणामारी, दगाफटका यांचे साक्षीदार बनूनच.

ही झाली पडद्यावरची गणेशभक्ती. पण पडद्यामागच्याही गणेशाशी संबंधित काही आठवणी आहेत. मीनाकुमारच्या होमी वाडियांच्या *गणेश महिमा* चित्रपटात गणपतीचा रोल करणारा कलाकार एक्स्ट्रापैकी कोणीतरी होता. त्यामुळे त्याचं नाव लक्षात राहण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. पण तो सिनेमा चांगला चालला आणि पुढे 'विनोद' नावाच्या एका साप्ताहिकात त्याचा गणपतीच्या गेटअपमधला फोटो मुखपृष्ठ म्हणून छापण्यात आला. आणि मुखपृष्ठाचं क्रेडीट देताना संपादकांनी हुशारीने लिहीलं होतं, '*गणेश महिमा*त श्रीगजानन.'

असाच आणखी एक किस्सा आहे, मूकपटाच्या जमान्यातला. त्यावेळी वसंत शिंदे एका मूकपटात गणपतीची भूमिका करत होते. त्यात त्यांना गणपती बनून एक नृत्य सादर करायचं होतं. स्टुडियोच्या गोडाऊनमध्ये ठेवलेल्या प्रॉपर्टीतली एक सोंड लावून वसंत शिंदे शॉट द्यायला आले. आतून पोकळ असलेल्या त्या सोंडेत एक विंचू लपून बसला होता. सोंड नाकाला लावल्यावर तो शिंदेंच्या नाकाला चावला आणि ते थयथया नाचू लागले. मूकपट असल्याने त्यांचं ओरडणं ऐकू आलं नसलं तरी ते दृश्य पडद्यावर मजेशीर वाटलं.

चित्रपटातल्या गणपतीचा विषय निघालाय तेव्हा मराठीत हिट ठरलेल्या *अष्टविनायक* या सिनेमाचा विसर पडून कसं चालेल? सचिन पिळगावकरच्या वडिलांनी बनवलेल्या या सिनेमात तर महाराष्ट्रातल्या अष्टविनायकांचं दर्शन आणि गणपतीच्या प्रत्येक स्थानाचं महत्त्व वर्णन करणारं असं लांबलचक गाणंच आहे. आजही गणपतीच्या दिवसांत ते गाणं गणपतीभक्त भक्तीभावाने ऐकतात. ✯